"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 04, Issue: 04, Jul. – Aug. 2017 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) - 4.935

# ''हुज्जातूल इस्लाम मौलाना कासिम नानोतवी यांचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील योगदान''

**प्रा. डॉ. अब्दुल्ला चाऊस**
सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभागप्रमुख,
डॉ.रफीक झकेरीया कॉलेज फॉर वुमेन्स,
औरंगाबाद (महाराष्ट्र) इंडिया

**प्रस्तावना :**

मौलाना कासिम नानोतवीचा जन्म उत्तर प्रदेश राज्यातील सहारनपूरच्या नानोता या खेडेगावी इ. स. १८३२ (हिजरी १२४८) मध्ये शेख समद अली यांच्या घरी झाला.[१] मौलानाचे पूर्वज मौलवी मोहम्मद हाशम यांना मुगल सम्राट शाहजहाँ याने नानोता जहागीरमध्ये दिले होते.[२] सय्यद अबूबकर सिद्दीक रजी अल्लाह–हुतालाहचे ४४ व्या घराण्याशी त्यांचा संबंध होता.[३]

सुरुवातीचे शिक्षण त्यांनी आपल्या गावी नानोता येथे घेतले. मक्तब (शळा) मध्ये शिक्षण घेण्यासाठी देवबंदला गेले. देवबंदमध्ये मौलवी महेताबकडून शिक्षण घेतले. तेथून ते आपले आजोबा यांच्याकडे गेले. जे सहारनपूरचे नामवंत वकील होते. येथे त्यांनी मौलवी नवाजकडून अरबी सर्फ व नहूचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. हजरत मौलाना ममलूक अली ननोतवी, मौलानाचे काका हे अरेबीक कॉलेज दिल्लीत प्राध्यापक होते. त्यांनी मौलानांना आपल्या सोबत दिल्ली येथे शिक्षणासाठी नेले. त्यांनी मौलानांचा प्रवेश अरेबीक कॉलेजमध्ये केला. मौलानांचा त्या महाविद्यालयात प्रवेश घेतला. कॉलेजमध्ये सर्वत्र अशी चर्चा झाली की, मौलानांना गणिताचे कोणतेही उदाहरण (प्रश्न) दिले की ते चटकन सोडवतात. त्या काळात मुन्शी जकीउल्ला यांनी गणिताचे काही जटिल प्रश्न आणले होते. ते प्रश्न बिनचूक सोडवल्यामुळे मौलाना कॉलेजमध्ये अतिशय लोकप्रिय झाले. परंतु मौलानांनी वार्षिक परीक्षा न दिल्याबद्दल कॉलेजच्या इंग्रज प्राचार्यालाही दुःख झाले होते.

त्या काळात प्रसिद्ध बुद्धीवान व समाजसुधारक सर सय्यद अहेमद खान यांनी मौलानांच्या बुद्धीमत्ता व उच्च विचारांसंबंधी असे उद्‌गार काढले होते, ''लोकांचे असे म्हणणे होते की, दिल्लीत मोहमंद इसहाक साहेब सारखा गुणवान माणूस जन्माला येणार नाही, परंतु मौलवी साहेबांनी आपले उच्च

चरित्र, गुण, सुकर्म, धार्मिकता, तकवा इ. गुणांमुळे आपले उच्च आदर्श जगासमोर ठेवले आणि काही बाबतीत ते मौलवी मोहमंद इसहाक साहेबांच्या ही पुढे गेले.[५]

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मौलाना नोकरीसाठी दिल्लीला गेले. तेथे त्यांनी अहमद अली मोहद्दीस सहारनपुरीच्या अहमदी प्रेसमध्ये 'प्रुफ रिडर' या पदावर नोकरीस आरंभ केला. त्याच काळात त्यांनी हजरत मौलाना अहमद अली रहेमतुल्लाह यांच्या आग्रहावरून सही–बुखारीचे शेवटच्या पाठांचा हाशया (सरळ शब्दात व्याख्यान व अनुवाद) लिहिले.[६]

मौलाना कासिम यांनी १८५२ इ. स. मध्ये सही बुखारीचे शेवटच पाच–सहा पानांचे सरळ भाषेत विचार मांडले व सरळ शब्दात त्यांनी हाशीया लिहिला. त्यावेळी मौलानांचे वय जेमतेम २१ वर्षे असेल.[७]

**हदीस अध्यापन पद्धत :**

हदीसचे विश्लेषण मौलाना हनफी पंथाप्रमाणे करीत होते. हजरत शेख–ऊल–हिंद अनुसार "मी शाह वलीउल्लाचे ग्रंथ पाहून हजरत नानोतवी यांच्या अध्यापनास हजर होतो आणि त्या गोष्टी विचारतो, ज्या फार कठीण आहेत, ज्यांचे उत्तर शाह साहेबांकडे शेवटी मिळते त्याच प्रश्नांचे उत्तर मौलानांकडे सर्वात प्रथम मिळते. मला वारंवार या गोष्टीचा अनुभव आला."[८]

दारूल–उलूमच्या सुरुवातीच्या दिवसात त्यांनी छत्ता मशिद, देवबंद येथे 'अखलीदस'चे [illegible]

**सामाजिक कार्य :**

मौलाना कासिम यांनी आपल्या समाजामध्ये सुधारणेचे अनेक कार्य शरीयतनुसार केले पण त्यात सर्वात महत्त्वाची सुधारणा म्हणजे विधवांचा पुनर्विवाह होता. या कामाची सुरुवात त्यांनी आपल्या घरात

केली. मौलानांनी आपल्या मोठ्या विधवा बहिणीचा निकाह (लग्न) करून विधवेला एक नवीन जीवन दिले व समाजामध्ये रूढ झालेल्या परंपरेला मोडून टाकले.[९]

**१९५७ नंतरचा काळ :**

या काळात मौलानांचे वय जवळपास २५ वर्षे असेल आणि ते दिल्लीत 'प्रुफ रीडर'ची नोकरी करीत होते. जेव्हा ते आपल्या घरी नानोताला आले होते. तेव्हा त्यांनी ऐकले की, मेरठ छावणीमध्ये ऊठावाची सुरुवात झाली. समस्येचे कारण काडतूस (Greased Cartridges : 'Enfield Rifle') वर लागलेली चरबी होती.

२९ मार्च १८५७ रोजी बारकपूरच्या पलटणीतील **मंगल पांडे** याने अशी काडतुसे वापरण्यास नकार दिला. तर वापरण्याबाबत सक्ती करणाऱ्या **मेजर ह्यूसन**चा खून केला. इंग्रजांनी मंगल पांडेला कैद करून ८ एप्रिल १८५७ रोजी फाशी दिली. तो या संग्रामातील पहिला हुताम ठरला. या घटनेनंतर भारतीय सैनिकांनी इंग्रज अधिकाऱ्यांचे आदेश धुडकावून लावले. त्यामुळे मार्शल कोर्टमध्ये त्यांच्या विरुद्ध खटला दाखल करण्यात आला व शिक्षाही देण्यात आली. या संग्रामाचा जास्तीत जास्त परिणाम उत्तर प्रदेश व उत्तर भारतात होता.[१०]

**संग्रामामध्ये थाना भवनचा सहभाग :**

थाना भवन (उत्तर प्रदेश) जाहगिरदार घराण्याचे दोन भाऊ काझी अब्दुल रहीम व काझी इनायत अली यांचा १८५७ च्या संग्रहामात मोठा सहभाग होता. इंग्रजाना पराभूत करण्याकरिता अब्दुल रहीम हे सहारनपुरला हत्ती खरेदीसाठी गेले आहे, ही बातमी खबऱ्याने इंग्रजांना दिली व सांगितले की, मोठ्या उठावाकरिता खूप धावपळ करू लागले. त्या कारणामुळे पोलिसांनी त्यांना अटक केली व विचारपूस न करता त्यांना कारावासाची शिक्षा देण्यात आली.

या घटनेनंतर काझी साहेबांचे भाऊ काझी इनायत अली यांनी आपल्या भावाच्या खुनाचा बदला घेण्याची शपथ घेतली. उठावात सहभागी उलेमा व मशाऐख या लोकांची एक सभा भरविण्यात आली. त्या सभेत सर्वात प्रथम नाव हुज्जातुल इस्माल हजरत मौलाना कासिम नानोतवी, इमामूल आरेफी व मौलाना रशीद अहेमद गंगवही, मौलाना मोहमंद जामिन शहिद, मौलाना मुनिर नानोतवी, हजरत हाजी इमदाद–उल्ला, महाजिर मक्की इ. होते. या सभांमध्ये '**जिहादाचा निर्णय**' घेतला पण आता नवीन समस्या

निर्माण झाली की, शरीअत प्रमाणे जिहादासाठी 'अमीर' (सरदार) आवश्यक आहे. त्याचवेळी मौलानांनी 'अमीर' या पदासाठी हाजी इमदाद-उल्ला थानवीचे नाव सुचित व अनुमोदीत केले व सर्वांनी आपली अनुमति दर्शविली आणि मजलिस-ए-शूरांच्या सभेत हाजी साहेबाला "अमीरूल-मोमीनीन" बनविण्यात आले.[१२] व त्यांच्या हातात सर्वांनी (बैत) शपथ घेतली. मौलाना कासिम **नानोतवीला मुख्य सेनापती** तर मौलाना मुनिर सहाय्यक सेनापती आणि सचिव पदी मौलाना रशिद अहमद गंगवहीला नियुक्त करण्यात आले.[१३]

**नानोतवीचे नेतृत्व व जिहाद :**

काझी इनायत अली यांनी पूर्वीच उठावाची सुरुवात केली होती व इंग्रज सैनिकांशी गोळा बारूद व युद्धासाठी लागणारी रसद (दारू-गोळा) गोळा केली होती. नानोतवीची नियुक्ती स्वातंत्र्य सेनेचे मुख्य सेनापती पदावर करण्यात आली होती. जिहादपूर्वीच काझी इनायत अली यांनी शेरअली बाग येथे जाऊन इंग्रजांच्या सैनिकांकडून गोळा बारूद झपटले होते. हे कार्य त्यांनी स्वत:च्या बळावर केले होते. युद्धाची तयारी सुरू झाली. युद्ध नियोजनाप्रमाणे सर्वात प्रथम शामली तहसीलवर हल्ला करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी मोठी सेना गोळा करण्यात आली.[१४]

मोगलांच्या शेवटच्या काळात मुसलमानांची समज होती की, आपण सत्ताधारी असल्यामुळे आपले हे कर्तव्य आहे की, आपण इंग्रजांविरुद्ध उठाव करणे हे आपले कर्तव्य आहे आणि देशाचे रक्षणही आपले प्रथम कर्तव्य आहे. त्यामुळे त्या काळात जास्तीत जास्त मुस्लिम सेनेत भरती होत होते.[१५]

**शामली तहसीलवर कब्जा :**

नानोतवीच्या नेतृत्वात क्रांतीकारांनी शामली तहसीलवर नियोजनानुसार हल्ला केला. शामलीमध्ये एक गढी होती. त्यावर इंग्रजांचा ताबा होता. क्रांतीकारकांनी युद्धाची सुरुवात केली व दोघांच्या सैनिकांची प्राणहानी झाली. या युद्धात हाफीज जामीन शहीद झाले व इतिहासामध्ये 'शहीद' नावाने प्रसिद्ध झाले.

या युद्धात नानोतवी व त्यांच्या सहकारी क्रांतीकारांनी फार पराक्रमाने भाग घेतले व शामली तहसीलवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. तहसिलची इमारत पूर्णपणे उध्दवस्त केली व आपला विजयी ध्वज लावला. हा विजय एक लहान छावणीचा विजय होता. परंतु क्रांतीकारांचे पूर्ण राष्ट्रावर विजय मिळविण्याचे स्वप्न होते. आता इंग्रजांनी क्रांतीकारांना पूर्णपणे चिरडण्याचेच ठरविले व जेथे जेथे

क्रांतीकारांनी उठाव केले होते तेथे तेथे इंग्रजांनी आपले सैनिक अधिकारी पाठवले. शामली तहसीलवरही एका इंग्रज अधिकाऱ्यासहित मोठी सेना पाठविण्यात आली होती. त्याची बातमी काझी इनायतला मिळताच त्यांनी थानाभवन सोडले व तेथून ते नजीबाबाद येथे रोहिल्याच्या भागात गेले आणि तेथून कुठे गेले त्यांचा पत्ताच लागला नाही. इंग्रजांनी त्यांचा महल तोफेने उडवून दिला आणि थाना भवनला पूर्णपणे उद्धावस्त केले. इंग्रज सरकारने क्रांतीकारांच्या अटके करीता वारंट काढले. त्या यादीत हाजी इमदाद-उल्ला साहेब थानवी, मौलाना कासिम नानोतवी, मौलाना रशिद अहमद गंगवही, मौलाना मोहम्मद मुनिर नानोतवी इत्यादी नावे वारंट काढले. फक्त हजरत गंगवही यांनाच अटक झाली व इतर क्रांतीकारी इंग्रजांच्या हाती लागले नाही. हजरत हाजी साहेब कसेतरी मक्का येथे पोहोचले. पोलिसांनी नानोतवी यांच्या अटकेसाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी खबऱ्यांची देखील मदत घेतली परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यांनी वारंवार स्थळ बदलले. कधी नानोता तर कधी छत्ता मशिद देवबंद येथे थांबले.[१६]

**दारूल-उलूम देवबंदची स्थापना :**

हजरत मौलाना कासिम नानोतवी, रशीद अहमद गंगोही, जनाब जुल्फेकार साहब, मुनशी फजल हक साहब व इतर मित्रांनी भारतात, उत्तर प्रदेश (राज्य), जिल्हा सहारनपुरची एक तहसिल देवबंद जे की एक प्राचीन गाव आहे.[१७] देवबंद हा दिल्ली पासून १४४ कि.मी. अंतरावर आहे. ३० मे १८६६, गुरूवारी मशिदे छत्ताच्या उघड्या जागी डाळींबीच्या झाडाखाली स्थापनेचा मुहूर्त करण्यात आला.[१८] देवबंदच्या प्रथम अध्यापकाचे नांव हजरत मौलाना महेमूद देवबंदी होते. तर सर्वात पहिले विद्यार्थी हजरत-शेख-ऊल-हिंद मौलाना महेमूद-उल-हसन रहेमतूल्ला अलै होते.[१९] सुरुवातीस उलेमांनी मस्जीदे छत्ता येथे लहानसा अरबी मदरसा सुरू केला व नंतर त्याला नवीन जागेवर अर्थात आजच्या जागेवर स्थलांतर करण्यात आले.[२०] नंतर तेथून दारूल-उलूमला १२९० हजरी सन मध्ये काझी मशिद व त्यानंतर शहराबाहेर मोठी जागा खरेदी करून १२९१ हजरी सन इमारतीची आधारशिला ठेवण्यात आली.[२१] आज देवबंद दारूल-उलूम आशियातील एक मोठे विद्यापीठ आहे.

**नानोतवी यांचे कार्य आणि मृत्यू :**

"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 04, Issue: 04, Jul. – Aug. 2017 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) - 4.935

नानोतवी यांनी पहिले हज १८६०-६१ मध्ये आणि दुसरे हज १८७६-७७ मध्ये पूर्ण केले. हजरत मोहमंद पैगंबर यांच्या जीवनावर आधारित ''**आबे-हयात**'' नावाचे पुस्तक उर्दू भाषेत लिहिले. 'दारूल-उलूम देवबंद'ची स्थापना केली. 'प्रुफ रीडींग' केली. शिक्षकाचे कार्य केले व शामली उठावात सेनापतीचे कर्तव्य केले.

एप्रिल १८८० साली हजरत मौलाना कासिम नानोतवीचा मृत्यू वयाच्या ४९ व्या वर्षी झाला.

नानोतवींचे नामवंत विद्यार्थ्यांची नावे १) शेख-ऊल-हिंद मौलाना महेमूद-उल-हसन, २) मौलाना फखरूल हसन गंगवही, ३) मौलाना अहेमद हुसैन मुहद्दीस अमरूही, ४) मौलाना अब्दुल रहेमान अमरूही, ५) मौलाना हाफीज अब्दुल अदल, ६) मौलाना हकीम मन्सूर अली खॉन, ७) मौलाना अब्दुल अली मेरठी इत्यादी हे कासिम नानोतवींचे नामवंत विद्यार्थी होते.

**निष्कर्ष :**

मौलाना कासिम नानोतवी हे एक महान देशभक्त, क्रांतीकारी, धार्मिक पंडीत, शिक्षक, मार्गदर्शक, सेनानी होते.

मौलानांनी दारूल-उलूम देवबंद स्थापन केले. हे एक धार्मिक शिक्षणाचे केंद्र असून या देशात क्रांती उभी करण्याचेही स्थळ होते. या केंद्राचा हेतू १८५७ च्या उठावात पराजयाची पूर्ती करणे होते. अर्थात देशात स्वातंत्र्यासाठी योग्य वातावरण तयार करणे, देशासाठी जिहाद करणारी युवा पिढी तयार करणे, आदर्श देशभक्त तयार करणे या हेतूनेच दारूल-उलूम देवबंदची स्थापना करण्यात आली होती. नानोतवी यांनी थाना भवनाच्या संग्रामामध्ये क्रांतिकारांचे नेतृत्व एका सेनानी या नात्याने केले. एक शिक्षक या नात्याने त्यांनी आपले विद्यार्थ्यांचे उत्तम मार्गदर्शन केले.

❖❖❖

## संदर्भ

१) लेखक : सयृयद महेबूब रिझवी, तारीख, दारूल-उलूम देवबंद, खंड पहिला, पान क्र. १०२, प्रकाशक : इदारा-ए-एहतमाम दारूल-उलूम देवबंद, यु. पी. प्र. व. १९७६.

२) लेखक : असीर उदरवी, ''मौलाना मुहम्मद कासिम

नानोतवी हयात और कारनामे'', पान क्र. ३२.
प्रकाशक : शेख-उल-हिन्द अॅकॅडमी, दारूल-उलूम-देवबंद, प्र. व. १९९७.

३) किता, पान क्र. ३३

४) लेखक : सय्यद महेबूब रिझवी, ''तारीख दारूल उलूम देवबंद'' खंड पहिला, पान क्र. १०३२.
प्रकाशक : इदारा-ए-एहतमाम, देवबंद, प्र. व. १९७६.

५) किता, पान क्र. १०५.

६) किता, पान क्र. १०७.

७) किता, पान क्र. ११३.

८) किता, पान क्र. १२०.

९) लेखक : मै. अमीर अदरवी, ''मौलाना मुहम्मद कासिम नानोतवी'', पान क्र. १२०.
प्रकाशक : शेख-उल-हिंद अॅकॅडमी, प्र. व. १९९७.

१०) किता, पान क्र. ७८-७९.

११) किता, पान क्र. ७८-७९.

१२) किता, पान क्र. ७३.

१३) लेखक : सय्यद महेबूब रिझवी, ''तारीख दारूल उलूम देवबंद'' खंड पहिला, पान क्र. ८३.
प्रकाशक : इदारा-ए-इहतमाम दारूल उलूम देवबंद, प्र. व. १९७६.

१४) लेखक : मौलाना असीर अदरवी, ''मौलाना मुहम्मद कासिम नानोतवी हयात और कारनामे'',
पान क्र. ८४. प्रकाशन : 'शेख-ऊल-हिंद अॅकॅडमी दारूल उलूम देवबंद, प्र. व. १९९७.

१५) किता, पान क्र. ८५.

१६) किता, पान क्र. ८९.

१७) लेखक : सय्यद महेबूब रिझवी, ''तारीख दारूल उलूम देवबंद'' खंड पहिला,
पान क्र. १२९-३०. प्रकाशक : इदारा-ए-इहतमाम दारूल उलूम देवबंद, प्र. व. १९७६.

१८) लेखक : मौलाना असीर अदरवी, ''मौलाना मुहम्मद कासिम नानोतवी हयात और कारनामे'',

पान क्र. १२९. प्रकाशन : 'शेख-ऊल-हिंद अॅकॅडमी दारूल-उलूम देवबंद, प्र. व. १९९७.

१९) लेखक : सय्यद महेबूब रिझवी, "तारीख दारूल उलूम देवबंद" खंड पहिला, पान क्र. १५५. प्रकाशक : इदारा-ए-इहतमाम दारूल उलूम देवबंद, प्र. व. १९७६.

२०) Author : Barabara daly Metcalf, Islamic revival in British India, Page No. 88, Publication : Prinction University Press, New Delhi.

२१) लेखक : उबैदउल्ला कुदसी, "आजादी की तहरीक", पान क्र. ८३. प्रकाशक : इदारा-ए-सकाफत, इस्लामिक क्लब रोड, लाहोर, प्र. व. १९८८.

❖❖❖